सकाळ

संगीत सरिता महोत्सवात रंगले विद्यार्थी

■ **संदेश देशमुख** (इंदिरा कॉलेज, ताथवडे)

श्री पायलम एज्युकेशन सोसायटीचे इंदिरा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचा संगीत विभाग आणि ताल्पतिरुमल पुणे यांच्यातर्फे संगीत सरिता राष्ट्रस्तरीय संगीत स्पर्धा व महोत्सव उत्साहात झाला. गोवा, कर्नाटक, गुजरातसह राज्यातील १६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. मृत्यू शिल्पांक संदीप सोपारकर, संस्थेचा संस्थापक सचिव आणि ज्यांच्यासंकल्पनेतून संस्था उभी राहिली ते डॉ. सतीश सोनार यांच्या हस्ते पारितोषिक देऊन विजेत्यांचा गौरवदेखील करण्यात आले. प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी उपस्थित होते. पुरस्कार कार्यक्रमाचे अधिकारी डॉ. पंडित खाडी यांच्यासह मान्यवरांनी सहभाग नोंदवला.

डॉ. सोनार म्हणाल्या, 'कलेचे विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात संगीत शिक्षणाचा अमूल्य ठेवा म्हणून जपले पाहिजे.' प्रा. विनोद मंगले (जॅमेंतॉत), पं. समीर मुळेकरी (तालवाद्य), स्वरदीप दीक्षित (ज्यालतरंग तालवाद्य), पं. राजीव तांबे (स्वरवाद्य), शशिकांत पायकराड (ज्यालतरंग स्वरवाद्य), राजश्री पोतदार (शास्त्रीय नृत्य), पुष्पा पुजारी (लघुगुरू नृत्य) यांनी परीक्षण केले. अभिजित पाटणकर, सुधीर देवकाते (संयोजन), मेघना ठोंबरे, आरती निलखाडे (स्वागत) यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. संगीत विभागप्रमुख प्रा. वीणा खाडीलकर यांनी आभार मानले. डॉ. सचिन चव्हाण, प्रा. किरण पंटेवाले, डॉ. शोभा जगताप, डॉ. रिचिका पवळे, डॉ. प्रतिभा सोनवणे, प्रा. पूजा जाधव, प्रा. निपुण मित्तल, प्रा. अमृता ठुबे, डॉ. पूजा वलवे, प्रा. शर्मिला गंगे, प्रा. साक्षी सिकदार, मिता पालनिय, सुप्रभा इंगळे, स्वप्नाली वाघदरे, वैशाली पाटणे, जगन्नाथ कदम आदींनी संयोजन केले. स्मृती पवित्रा, सृष्टी साळे, ऊर्जा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

स्पर्धेतील विजेते (अनुक्रमे)

उपशास्त्रीय गायन : फाल्गुनी देशपांडे, करण देशपांडे, अन्वेषा मुखर्जी, अनिरुद्ध इप्पलपेल्ली; सुगम गायन : पार्थ्वी देशमुख, मिताली कोहाड, देवश्री जोशी, सायली तिवारी, तालवाद्य : गणेश कदम, कुणालसिंग पवार, अन्वित राऊत, स्वरांश केसकर; चरस्थायी वाद्यवृंद : अंकुर पेठे, हर्ष पुरो, पवन अंबेरिया, अथर्व निंबाळकर, स्वरवाद्य : अदिनेश लवीव, सृष्टी राऊत, प्रथमेश हरिदास, देवेश ठाकूर, चरस्थायी स्वरवाद्य : अदिती अहिरराव, अनिश पवार, सृष्टी राऊत, सुनीता पाटील; शास्त्रीय नृत्य : तृप्तिन्हा पाटील, अमृता भंडारी, अंकिता चिटे, माई आवटे; लघुगुरू नृत्य : किमया महाली, सायली पवाले, मेघा साईगावकर, देवेन्द्र लोंढे.

इंडक्शन प्रोग्रॅम उत्साहात

■ **सिद्धांत दोशी** (रसिकलाल धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड)

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित चिंचवड येथील रसिकलाल धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्रॅम आयोजित केला होता. यूनिक अॅकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण चाटीस, मेडिकल ऑफिसर डॉ. मनीषा धोपेश्वरकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने डॉ. ज्योती शिंदे प्रमुख पाहुणे होते. मंडळाचे मेडिकल ऑफिसर के. बी. चिंतले, प्राचार्य डॉ. सविता केसवे उपस्थित होते. यावेळी पूजन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. प्राचार्य डॉ. केसवे यांनी प्रास्ताविक केले. चाटीस यांनी 'कम्युनिकेशन स्किल्स व सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंट' विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांचा विद्यार्थीच त्यांच्या देवीदेव डोक्यासमोर अभ्यास करत नव्हते. यामागे त्यांनी वेगवेगळ्या प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांचे उदाहरण दिले. प्रोफेसर प्रेरणादायी कार्यशैलीत विद्यार्थ्यांना केले. प्रा. संतोष तांबे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. स्वाती डोंगरे यांनी आभार मानले. प्रा. मंजुश्री गुंजेकर यांनी संयोजन केले. दुसऱ्या सत्रात 'स्पर्धात्मक करिअर ऑप्शन्स आफ्टर डिप्लोमा' विषयावर डॉ. ज्योती शिंदे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी फार्मास्युटिकल इंडस्ट्री, रुग्णालये व त्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक पात्रतेची माहिती दिली. प्रा. सुनिता खंडेराव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मनीषा महाजन यांनी आभार मानले. संयोजन समिती सदस्य प्रवीण चाटीस, कार्यालयीन अधिकारी सुनिता तुकडे, ऑफिस सेक्रेटरी अँड. राजेंद्रकुमार पुरा, मोलप्पा प्रभालवंद, सोपान गाढवे मार्गदर्शन लाभले.

Pune Pdc Today
Copyright Page No 6